# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३५१/२०२३ दिनांक – १२/१०/२०२३

## Telegram Task द्वारे फसवणुक झालेल्या तक्रारदार यांचे ७,००,०००/- रु त्यांचे खात्यात परत केल्याबाबत- सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी !!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत काशिमिरा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणा-**या महिला नामे श्रीमती. जिगना ------** या पार्ट टाईम जॉब करीता ऑनलाईन सर्च करीत होत्या. ऑनलाईन सर्च करीत असताना एका टेलीग्राम ग्रुपमध्ये ऑनलाईन पार्ट टाईम जॉब करुन पैसे कमविण्याबाबत जाहिरात त्यांनी पाहिली. दिनांक २५/०३/२०२३ रोजी तक्रारदार यांना पार्ट टाईम जॉब करीता मॅसेज प्राप्त झाला. त्यानंतर संशयीत टेलीग्राम खाते धारकांकडुन ऑनलाईन टास्क पुर्ण करुन प्रत्येकी टास्क १३००-१००० रु रोज कमविता येतात असे सांगितले.त्यावर विश्वास ठेवुन तक्रारदार यांचेकडुन वेळोवेळी टास्क विकत घेण्यास सांगुन त्यांची दिनांक २५/०३/२०२३ व दिनांक २६/०३/२०२३ अश्या ०२ दिवसांमध्ये **एकुण ७,९३,६०१/-** केवळ फसवणुक केली होती.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक झाल्याबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारी अर्ज दिला होता. **(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक ७७२-बी/२०२३ दिनांक २९/०३/२०२३ अन्वये चौकशीकामी प्राप्त झाला.) श्रीमती. जिगना ------ यांचे** प्राप्त तक्रारी अर्जाचे अनुषंगाने सायबर गुन्हे कक्षाकडुन तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे बँक खात्यातुन झाले व्यवहाराचे विश्लेषण करुन तक्रारदार यांची रक्कम वर्ग झालेल्या बँकेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन झालेल्या व्यवहार रद्द होवुन रक्कम गोठविण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला.

तसेच नमूद **श्रीमती. जिगना ------ यांचे** तक्रारीच्या अनुषंगाने **काशिमिरा पोलीस ठाणे गु.रजी नं ४७८/२०२३ भादविस ४२०,३४, माहिती व तंत्रज्ञान अधिनियम ६६ डी प्रमाणे** दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर तक्रारदार यांची रक्कम गोठविण्यात आलेल्या रक्कमेचा परतावा होण्याकरीता मा. न्यायालयात सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मा. न्यायालयात तक्रारदार यांचे फसवणुकीबाबत सायबर गुन्हे कक्ष यांचा सविस्तर अहवाल सादर करण्यात आला.मा. न्यायालयाने सदरचा अहवाल ग्राहय धरुन तक्रारदार यांची गोठविलेली रक्कम परत करण्याकरीता संबंधीतांना बँकांना आदेश दिले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या **रक्कमेपैकी ७,००,०००/- रुपये त्यांचे मुळ** खात्यावर परत करण्यात आलेले आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अनोळखी वेबसाईट/ॲपद्वारे प्राप्त मॅसेज किंवा लिंक यांची पडताळणी केल्याशिवाय कोणतीही कारवाई करु नये.**
- **Work From Home जाहिराती मध्ये गुंतवणूकीवर विश्वास ठेवू नये.**
- **अधिक नफा मिळण्याचे आमिष दाखविणाऱ्या जाहिरातीपासून सावधान रहावे.**
- **कोणत्याही लिंक मध्ये किंवा फोन केलेल्या अनोळखी व्यक्तीकडे आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **सोशल मिडीयाचा वापर करताना संबंधीत माहितीची पडताळणी केल्याशिवाय गुंतवणुक करु नये.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी.शेनोळकर, पो.अं.१२०९५ गणेश इलग, म.पो.अं.१३१०४ पल्लवी निकम यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- **www.cybercrime.gov.in**